# रेग्युलर दिवाणी मुकदमा नं. १३९/२००२ मधील नि. १०८ वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादीने वादपत्रात दुरूस्ती करणेकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तावित दुरूस्तीमध्ये असे कथन केलेले आहे की, वादी क्र.२ याच्या नांवे एकत्र कुटुंब मॅनेजर म्हणून सर्व्हे नं. ४० च्या ७/१२ मध्ये नोंद झालेली आहे ती जमीन या दाव्याचे कामी सामील केली होती, परंतु त्या जमिनीपैकी कोणताही भाग वादीचे नांवे नसल्याने सदर मिळकत दाव्याचे कामातून वगळणे आवश्यक आहे, तर सर्व्हे नं. २८ मध्ये शंकर कृष्णा कुंभार व वसंत महादेव कुंभार हे दोन हिस्सेदार आहेत, त्यांना या दाव्यात सामील करणे गरजेचे आहे, म्हणून वादपत्रात दुरूस्ती करण्याची मागणी केलेली आहे.

२. प्रतिवादी यांनी नि.११० वर त्यांचे लेखी उत्तर दाखल करून अर्जास विरोध केला. त्यांच्या म्हणणेनुसार दावा दाखल करतेवेळेस वादीने जाणुन—बुजून सर्व्हे नं. ४० दाव्यात सामील केला, त्यामुळे आता अशी मागणी वादीला करता येणार नाही. त्यांच्या म्हणणेनुसार वादीने दाव्यामध्ये अनेक वडिलार्जित मिळकती सामील केलेल्या नाहीत, त्या

मिळकती देखील दाव्यामध्ये सामील करून घ्याव्यात असा वादीस आदेश व्हावा. जर अर्ज मंजुर केला तर जास्त कॉस्ट करावी.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर असे निदर्शनास येते की, २००२ सालामध्ये वादीने दावा वाटपाकरिता व जाहीरनाम्याकरिता दाखल केलेला आहे. दाव्यामध्ये वडिलार्जित मिळकती म्हणून एकूण सहा मिळकती दर्शविलेल्या आहेत, त्यापैकी सर्व्हे नं. ६० ही मिळकत वडिलार्जित मिळकत म्हणून दर्शविलेली आहे. २००२ सालापासून प्रस्तुत अर्ज दाखल करण्यापर्यंत ती सर्व्हे नं. ४० ची मिळकत वडिलार्जित नाही ही बाब विचारात घेतली नाही व आता प्रस्तुत अर्ज दाखल करून ही मिळकत दाव्यातून काढून टाकण्याची विनंती केलेली आहे, तर इतर दोन लोकांना दाव्यामध्ये सामील करावे अशी देखील मागणी केली. समोर आलेल्या परिस्थितीवरून हे स्पष्ट होते की, वादीने दावा दाखल करतेवेळेस योग्य ती काळजी घेतलेली नाही व इतक्या वर्षानंतर एकदम एखादी मिळकत गाळण्याची व नवीन लोकांना दाव्यात सामील करण्याची मागणी केली. वादीच्या या हयगयीमुळे व निष्काळजीपणामुळे प्रतिवादींना अडचण व त्रास होणार

आहे. परंतु प्रस्तावित दुरूस्ती दाव्याच्या अंतिम निकालाकरिता गरजेची आहे, त्यामुळे दाव्याचे मुळ स्वरूप बदलणार नाही. प्रतिवादींना झालेला त्रास व अडचण पैशाच्या स्वरूपात भरपाई केली जावू शकते, म्हणून खालील आदेश देत आहे.

## आदेश

१. अर्ज रू.५००/—(रूपये पाचशे फक्त) खर्चावर मंजुर करणेत येत आहे.

२. खर्चाची रक्कम प्रतिवादींना देणेच्या अटीवर वादीला वादपत्रात मागणीप्रमाणे दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

३. वादीने दाव्याची दुरूस्त प्रत दाखल करावी.

ठिकाण : पाटण

दिनांक : २०.०६.२०११

(कि.रं. देशपांडे)
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पाटण